# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा देणा-या स्त्री परिचरांच्या मानधनाबाबत**

**(१) २१३५ (२४-१२-२०१४). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण भागात आरोग्य केंद्रांमार्फत आरोग्य सेवा स्त्री परिचरांना देण्यात येणा-या मानधनाच्या वाढीबाबतचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरोदर महिलांना सेवा पुरविण्यासाठी या स्त्री परिचरांना अनेक दुर्गम ठिकाणी कोणत्याही साधनाविना जावे लागते,

(३) असल्यास, या गरोदर महिलांना सेवा पुरविणा-या स्त्री परिचरांना तालुकास्तरापर्यंत वा उपजिल्हा रुग्णालयापर्यंत साधनांच्या व्यवस्थेसंबंधी विशेष आराखडा तयार करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, आराखड्याचे स्वरुप व व्याप्ती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) ग्रामीण भागातील उपकेंद्रात आरोग्य सेविकांना (ANM) ला मदतनिस म्हणून अंशकालीन स्त्री परिचर कार्यरत आहेत. या अंशकालीन स्त्री परिचरांच्या मानधनाचा प्रस्ताव वित्त विभागाच्या निर्देशानुसार ७ वा वेतन आयोग शिफारशी त्रुटी निवरणार्थ नेमण्यात आलेल्या बक्षी समितीसमोर विचारार्थ ठेवलेला आहे. त्यांचा निर्णय अद्याप विभागाला प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) अंशकालीन स्त्री परिचर या स्वतंत्रपणे सेवा सेवा देत नसून त्या आरोग्य सेविका यांच्या मदतनीस म्हणून कार्यरत असतात व ग्रामीण आरोग्य सेवेसाठी व साधनसामग्रीसाठी शासन / डिपीडीसी अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत पुरेशी साधनसामग्री व निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्हापरिषदेमध्ये एलएचव्ही आरोग्य सहायक महिला पदे रिक्त असल्याबाबत

**(२) १२८९२ (१०-०४-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हापरिषदेमध्ये २२११ लेखशिर्षाखालील एलएचव्ही आरोग्य सहायक महिला पदे रिक्त असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे तात्कळ भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

याबाबत पत्रव्यवहार झालेला नाही.

(२) सदर पदे लेखाशिर्ष २२११ (कुटुंब कल्याण) कार्यक्रमांतर्गत असून केंद्र सरकारने व्यपगत केली आहेत. ती पुनर्जिवित करण्यासाठी रत्नागिरी जिल्हा परिषद यांचा ग्रामविकास विभागाकडे पाठपुरावा चालू आहे.

(३) सदर पदे अद्याप पुनर्जिवित न झाल्याने भरण्यात आली नाहीत.

---

## हिवताप विभागातील हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेण्याबाबत

**(३) ३५५३५ (२३-०१-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील हिवताप विभागातील हिवताप निर्मुलन हंगामी फवारणी कर्मचाऱ्यांना वयाची अट न ठेवता दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे नागपूर येथे झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे तातडीने सेवाजेष्ठते प्रमाणे कायम सेवेत सामावून घेण्यात यावी अशी मागणी दिनांक ६ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे सहसंचालक, आरोग्य सेवा हिवताप हत्तीरोग, पुणे यांचेकडे लोकप्रतिनिधींनी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हंगामी कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठते प्रमाणे कायम करण्याबाबत कोणतीच कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व यासंदर्भात तातडीने कारवाई करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

या प्रस्तावावर, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या शासन सेवेत विहीत सेवापरिक्षांद्वारे भरतीच्या सुचना त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाचे सन २००५ चे परिपत्रक व या पदाच्या सेवाप्रवेश नियमाच्या अधिसूचनेनुसार सदर प्रस्ताव तपासून या कर्मचा-यांचे थेट नियुक्ती/समावेशन करता येणार नसल्याचे संचालक यांना शासन मान्यतेने कळविण्यात आले होते.

(३) सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार एकूण नामनिर्देशनाद्वारे भरावयाच्या पदांमध्ये ५०% जागा ९० दिवस हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र असलेल्या कर्मचा-यांसाठी राखीव ठेवण्याबाबत अधिसूचित केले आहे व यानुसार पदभरती प्रक्रिया करण्यात येत आहे.

---

**अंशकालिन स्त्री परिचरांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(४) ३६२९१ (२३-०१-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंशकालिन स्त्री परिचर यांनी रुपये १५,०००/- इतके मानधन मिळावे, शासकिय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून जि.प मध्ये सहभागी करावे, अर्धवेळ हा शब्दप्रयोग काढून पूर्णवेळ स्त्री परिचर असा नामोल्लेख व्हावा, गणवेश व ओळखपत्र देण्यात यावे, प्रवासभत्ता व दैनिक भत्ता मिळावा, वृध्द स्त्री परिचरांना पेंशन मिळावी आदि मागण्या अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित मागण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर मागण्या राज्यवेतन सुधारणा समितीसमोर सादर करण्यात आला आहे. यावर वित्त विभागाकडून अंतिम आदेश अद्याप प्राप्त झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात**
**वैद्यकीय अधिकारी गैरहजर असल्याबाबत**

**(५) ३८७७९ (२३-०२-२०१६). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी गैरहजर व आरोग्य केंद्र बंद असल्याने रुग्णांचे गैरसोय होत असून त्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असल्याबाबतची वारंवार तक्रारी असताना प्रशासनाचे दुर्लक्ष करीत असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी सक्षम वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांचे हाल होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशी अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०६-२०१९) :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) कुडुस (ता.वाडा, जि.पालघर) प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी व ३१ कर्मचाऱ्यांची पदे असून सर्व पदे भरलेली आहेत. सदर प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यावेळी कुडुस येथे कार्यरत असलेले एक वैद्यकीय अधिकारी हे दि.१९.१.२०१५ पासून गैरहजर होते तर दुसरे वैद्यकीय अधिकारी दि.२४.७.२०१३ पासून निलंबित होते. या अधिकाऱ्यांच्या जागी अन्य दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांना तेथील कामकाजाचे आदेश देण्यात आले असून सदर प्राथमिक आरोग्य केंद्रावर रूग्णांना सुरळीतपणे आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. गैरहजर असणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याची दि.५.१०.२०१५ ते दि.२४.५.२०१६ या कालावधीतील १४३ दिवसांची रजा पालघर जिल्हा परिषदेच्या दि.५.३.२०१८ च्या आदेशाने विना वेतन व भत्ते नियमित करण्यात आली आहे. त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्याचा प्रस्ताव संचालनालयाच्या दि. १८.२.२०१९ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची शासनस्तरावर छाननी करण्यात येत असून तदनुरूप नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## राजीव गांधी जीवनदायी योजनेतर्गत लाभार्थ्यांना वितरीत होणाऱ्या औषधांची विक्री होत असल्याबाबत

**(६) ३९८३६ (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका आरोग्य सेवा अंतर्गतच्या रुग्णालयात वा विवाक्षितपणे महानगरपालिका सामान्य रुग्णालयात, स्वाथ्य उपकेंद्रात तसेच महानगरपालिका आरोग्य सेवा अधीनस्त इस्पितळात राजीव गांधी जीवनदायी योजनेतंर्गत लाभार्थ्यांना वितरीत होणाऱ्या औषधांची खुलेआम विक्री तसेच एकाधिकारशाही तत्वावर औषध खरेदी/विक्री व्यवहार होत असल्याबाबतची बाब मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब व वैद्यकीय शिक्षण), मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व वैद्यकीय शिक्षण), महासंचालक (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण व वैद्यकीय शिक्षण) तसेच त्यांच्या असलेल्या संबंधित

रुग्णालयाच्या प्रमुखांकडे महानगरपालिका प्रादेशिक आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास सदरची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुखांनी आणि संबंधित रुग्णालयाच्या अधिष्ठाता यांच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय संस्थांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी यांनी सदरची बाब शासनाच्या आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे लेखी स्वरुपात सार्वजनिक आरोग्य तथा वैद्यकीय मेळाव्यात नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बाबतीत शासनाने कोणती धडककृती कार्यक्रम आखण्याची कार्यवाही केली वा धडक कृती कार्यक्रम गठीत केला आहे तसेच त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (पुर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) ३० निवडक विशेष सेवांतर्गत ९७१ प्रकारचे गंभीर व अधिक खर्चिक उपचार व १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा (फॉलोअप) समावेश असून लाभार्थी रुग्णांना अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयामधून रोख रक्कमरहित (कॅशलेस) या वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात. योजनेंतर्गत वार्षिक विमा संरक्षण रक्कम प्रति वर्ष/ प्रति कुटुंब रु. १.५० लक्ष एवढया मर्यादेपर्यत मोफत उपचार अनुज्ञेय असून मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी सदर मर्यादा रु. २.५० लक्ष एवढी आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आजारांवर मात करण्याकरिता असलेल्या विशिष्ट योजना बंद झाल्याबाबत

**(७) ४०४५५ (१०-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांमध्ये एड्स, क्षयरोग, किडनीचे आजार व इतर विकारांवर मात करण्याकरिता घरोघरी जाऊन रुग्णांना मदत करण्याकरिता असलेली विशिष्ट योजना बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औषधांचा तुटवडा व सल्लागार प्रशिक्षनाविना हि योजना राबवत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेला आर्थिक मदत न मिळाल्यामुळे वैद्यकीय कर्मचारी वर्ग वेतन थकीत असल्याने काम सोडून गेल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना परत पूर्ण तयारीने राबविणेबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, सदर योजना बंद करणार आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण हा कार्यक्रम केवळ ८ जिल्हयांकरिता मर्यादित नसून हा कार्यक्रम राज्यात सर्व जिल्हयांमध्ये सन २००३ पासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राबविण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांना लागणारी क्षयविरोधी औषधी केंद्र शासनातर्फे मोफत उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण हे नियमित व सातत्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात येतात.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय बालस्वरुप कार्यक्रमांतर्गत खाजगी शाळेतील मुलांची आरोग्य तपासणी करणेबाबत**

**(८) ४१३७३ (२५-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शुन्य ते १८ वयोगटातील मुला-मुलींमध्ये हृदयविकाराचे प्रमाणात लक्षणीय वाढ होत असून १३८ मुला-मुलींना हृदयविकार असल्याचे आढळून आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय बालस्वरुप कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी शहरी व ग्रामीण भागात फक्त अंगणवाडी आणि शासकीय शाळांमधूनच होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे खाजगी शाळातील मुलांमधील हृदय विकारासारखे आजाराकडे दुर्लक्षित होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राष्ट्रीय बालस्वरुप कार्यक्रमांतर्गत शहरी व ग्रामीण भागातील खाजगी शाळातील शुन्य ते १८ वयोगटातील आरोग्य तपासणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

| सन | आढळलेले हृदयरोगी | शस्त्रक्रिया केलेले हृदयरोगी |
|---|---|---|
| २०१६-१७ | ३२१२ | २२६० |
| २०१७-१८ | ३४०८ | २४११ |
| २०१८-१९ (नोव्हेंबर) | २००६ | १३४९ |

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत दरवर्षी जास्तीत जास्त मुलांची आरोग्य तपासणी होऊन त्यांचे हृदयरुग्ण म्हणून निदान निश्चीत करुन उपचार देण्यात येत आहेत.

(२) होय, तथापि, शासन अनुदानीत शाळांमध्येही तपसणी केली जाते.

(३) नाही

(४) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व अंगणवाडीतील मुलांची वर्षातून दोन वेळा, तसेच सर्व शासकीय आणि शासन अनुदानीत शाळांतील मुलांची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी करुन त्यांना उपचार तसेच, उपचारासाठी संदर्भीत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि "जनस्वास्थ अभियानाबाबत"**

**(९) ४४०३० (१०-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि "जनस्वास्थ अभियान" च्या वतीने मुंबईतील देवनार येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान जनसुनावणी आयोजीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जनसुनावणीत राज्यातील सार्वजनिक आरोग्य संबंधी मानवाधिकार आयोगाने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(३) असल्यास, सदर आयोगाच्या शिफारशीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा सदरहू शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर जनसुनावणी जानेवारी २०१६ मध्ये आयोजित करण्यात आली होती.

(२) राज्य कामगार विमा योजनेच्या सर्व लाभार्थींना उपचार मिळण्याबाबत राज्य कामगार विमा मंडळाने कार्यवाही करावी.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत समुदाय स्तरावरील पर्यवेक्षण प्रणालीचे बळकटीकरण करण्यात यावे.

एच.आय.व्ही.सह जगणाऱ्या व्यक्तींसाठीच्या लक्ष्यित हस्तक्षेप कार्यक्रमासाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात यावी.

धर्मादाय रुग्णालयात गरीब जनतेला मोफत आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था सुरू करण्यात यावी.

माता मृत्युंचे अन्वेषण करण्यासाठी समुदाय स्तरावरील संस्थांचा सहभाग घेण्यात यावा.

मातांना मिळणाऱ्या भेदभावपुर्वक वागणुकीबाबत परिघीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येवुन त्यांची क्षमता बांधणी करण्यात यावी.

रुग्णांना रक्त धोरणाची अंमलबजावणी करण्यात यावी.

खाजगी रुग्णालयात मातांची प्रसुती झाल्यास त्यांना जननी सुरक्षा योजनेचा लाभ देण्यात यावा. तसेच सदर कार्यक्रमाचे वारंवार परीक्षण करण्यात यावे.

समुदाय आरोग्य सुविधा केंद्रात तसेच उपजिल्हा रुग्णालयात मोफत सोनोग्राफीच्या सुविधा देण्यात याव्यात.

प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच ग्रामीण भागातील आरोग्य सेवा पुरविणाऱ्या डॉक्टरांचे तसेच कर्मचाऱ्यांचे बदलीचे पारदर्शक धोरण अनुसरण्यात यावे. तसेच सर्व डॉक्टरांना ग्रामीण भागात ३ वर्ष सेवा देणे बंधनकारक करण्यात यावे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या रुग्ण तक्रार निवारण प्राधिकरणाची पुर्नरचना करण्यात यावी.

खाजगी रुग्णालयाविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्याबाबतच्या रुग्णांच्या तक्रारीच्या अनुषंगाने जे.जे. रुग्णालयात मार्फत राबविण्यात येणाऱ्या यंत्रणेचे स्वतंत्र परीक्षण करण्यात यावे.

राज्यात वैद्यकीय आस्थापना अधिनियम लागु करण्यात यावा.

(३) व (४) आयोगाच्या काही शिफारशींची पुर्तता झाली आहे.

---

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पूर्ण पिक कर्जमाफी देण्याबाबत**

**(१०) ५७७२३ (१५-०५-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठवाडा, विदर्भ यासह इतर किती जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पूर्ण पिक कर्जमाफी देण्याबाबत तसेच मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना सरकारमान्य रेशनधान्य दुकानावर स्वस्तधान्य पुरवठा करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासन दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पूर्ण पिक कर्जमाफी देण्याबाबत तसेच मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांना सरकारमान्य रेशनधान्य दुकानावर स्वस्तधान्य पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०५-२०१९) :** (१) अशंत: खरे आहे.

महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ अन्वये सन २०१६ च्या खरीप हंगामातील अंतिम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या पुणे, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील ६४७ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे.
(२) व (३) रिट याचिका क्रमांक ८५७/२०१५ (स्वराज अभियान वि.भारत सरकार व इतर) मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दुष्काळग्रस्त भागातील कुटुंबाकडे शिधापत्रिका नसल्यास योग्य तो पुरावा प्राप्त करून अथवा ओळख पटवून राष्ट्रीय सुरक्षा अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अन्नधान्य पुरवठा करण्याबाबत निदेश दिले आहेत.

राज्यातील मराठवाडा व विदर्भातील एकूण १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) मधील सर्व शेतकऱ्यांना अन्नधान्याचा लाभ देण्याबाबतचा निर्णय दिनांक २४ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शेतकरी लाभार्थ्यांना दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांप्रमाणे प्रतिमाह प्रतिव्यक्ती ५ किलो या परिमाणात गहू रू.२/- प्रतिकिलो व तांदुळ रू.३/- प्रतिकिलो या दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात येत आहे.

राज्यामध्ये सन २००९-१० पासून असलेला सततचा दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सहकार विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना-२०१७ ही कर्जमाफीची योजना जाहीर करण्यात आली आहे. राज्यमंत्रीमंडळाच्या मान्यतेने तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी गठित मंत्रीमंडळ उपसमितीने योजनेमध्ये अधिकाधिक शेतकऱ्यांचा समावेश व्हावा या अनुषंगाने वेळोवेळी निर्णय घेतले असून त्यानुसार योजनेची व्याप्तीही वाढविण्यात आली आहे. दिनांक १.३.२०१९ पर्यंत ४३.०९ लाख एवढा कर्ज खात्यांवर एकूण रूपये १८०९२ कोटी रक्कमेचा लाभ कर्जमाफी योजनेंअंतर्गत देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### उस्मानाबाद जिल्हयातील फळबागांना पुनर्जीवनासाठी अनुदान मिळणेबाबत

**(११) ५९३७१ (१६-०५-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबद जिल्हयातील दुष्काळ, गारपीट, पाणी टंचाई इ. कारणामुळे बाधित झालेल्या फळबागांच्या पुनर्जीवनासाठी National Horticulture Mission च्या माध्यमातून अंदाजे रु.३०,००० अनुदान देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फळबाग लावणारा शेतकरी त्यासाठी प्रचंड गुंतवणूक करतो आणि नुकसान झाले तर तो आर्थिक अडचणीत सापडतो त्यामुळे अशा शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी व त्यांच्या नुकसान झालेल्या फळबागांचे पुनर्जीवन करण्यासाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०५-२०१९) :** (१) होय.
(२) उस्मानाबाद जिल्हयात ७७३ लाभार्थ्यांना रु.१६३.३८ लाख एवढ्या रक्कमेचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती विभागातील सोयाबीन शेतकऱ्यांना हेक्टरी नुकसान भरपाईची मदत मिळण्याबाबत**

**(१२) ६१०९० (१५-०५-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती विभागातील खरीप हंगामात ज्या शेतक-यांनी सोयाबीनच्या विमा काढलेल्या नाही त्या महसूल मंडळात हेक्टरी नुकसान भरपाईच्या निम्मे रक्कम मदत स्वरुपात देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील सहा वर्षापासून असलेली दुष्काळग्रस्त स्थिती पाहता येथील सोयाबीन उत्पादकांना हेक्टरी नुकसान भरपाईची शंभर टक्के रक्कम मदत स्वरुपात देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२१-०५-२०१९) :** (१) व (२) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१६/प्र.क्र.१/म-७ दिनांक २९ डिसेंबर, २०१६ अन्वये खरीप २०१५ मधील औरंगाबाद, अमरावती, नागपूर व नाशिक विभागातील कापूस पिकांसाठी तसेच अमरावती व नागपूर विभागातील सोयाबीन पिकांसाठी पीक विमा योजनेची मंडळनिहाय मदत जाहीर झाल्यानंतर विमा काढलेल्या सर्व शेतकऱ्यांना विमा योजनेच्या निकषानुसार संबंधित विमा यंत्रणेमार्फत मदत देण्यात येईल. अशा शेतकऱ्यांना मंडळनिहाय जाहीर करण्यात आलेल्या पीक विमा योजनेअंतर्गत देय रक्कमेच्या ५०% रक्कम पीक विमा योजनेत सहभागी नसलेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला होता. व सदर निर्णयानुसार अमरावती विभागातील सोयाबीन पिकांच्या नुकसानीसाठी महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ६.१.२०१७ अन्वयेय रूपये ३८७.४३ कोटी, शासन निर्णय दिनांक १७.३.२०१८ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १९.३.२०१८ अन्वये कापूस व सोयाबीन पिकांसाठी रूपये ९.९४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पीक नोंदीची पध्दत आधुनिक तंत्रज्ञानानुसार विकसीत करण्याबाबत**

**(१३) ६२१८६ (१५-०५-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पिकांचे पेरणा क्षेत्र व उत्पादनाचा अंदाज याबाबत आपल्याकडील पध्दतीत अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे नेमका अंदाज व धोरण ठरविताना शासनाला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी पीक नोंदीची पध्दत आधुनिक तंत्रज्ञानानुसार विकसीत केल्यास, या व्यवस्थेतील अनेक त्रुटी दूर होऊ शकतील असे या क्षेत्रातील तज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन गाव-तालुका येथील पीक नोंदणी व अपेक्षित पीक मानधन देऊन कृषी पदवीधरांमार्फत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०५-२०१९) :** (१) होय अंशत: खरे

राज्यातील पिकांचे पेरणी क्षेत्र व उत्पादनाचे अंदाज हे नजर अंदाजीत असल्यामुळे प्रचलीत पध्दतीत काही त्रुटी आहेत.

(२) होय.

(३) पिकांचे क्षेत्राची अचूक नोंद व्हावी याकरिता शासनस्तरावरुन

१. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय राकृवि-२०१८/प्र.क्र.१६९/भाग-१/१४ अे, दि.२ मार्च, २०१९ नुसार राज्यातील पिकनिहाय लागवडीचे क्षेत्र अचूकपणे परिगणीत करता यावे तसेच पिकांचे काढणी पश्चात येणारे उत्पदनाचे अनुमान करुन सदर उत्पादनाचे नियोजन करणे याकरिता महाराष्ट्र सुदुर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर व राष्ट्रीय सुदुर संवेदन केंद्र, हैद्राबाद यांचे सहकार्याने सन २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीत ठराविक जिल्ह्यांसाठी महाॲग्री टेक प्रकल्प राबविण्यात येणार आहे. सदर प्रकल्पातंर्गत उपग्रह छायाचित्र, ड्रोन, ग्राऊंड टुथिंग इ. सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

२. महसूल व वन विभागाच्या दि.१०.९.२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांनी पिक पेरणी क्षेत्राची नोंद व पिकांचे छायाचित्रे शेतकऱ्यांनी स्वत: मोबाइल ॲपच्या माध्यमातून नोंदविण्यासाठी राज्यातील ६ महसूल विभागातील ६ तालुक्यांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

३. महालनोबिस राष्ट्रीय पुर्वानुमान केंद्र, नवी दिल्ली यांचेमार्फत खरीप व रब्बी हंगामात फसल कार्यक्रमातंर्गत ठरावकि जिल्ह्यामध्ये ठराविक पिकांचे क्षेत्र व उत्पादन गणतीसाठी ग्राऊंड टुथिंग करण्यात येत आहे.

(४) संबंधित नाही.

---

**गोंदिया जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटीवर कार्यरत असलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ व औषध निर्माते कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(१४) ६२७२५ (१५-०५-२०१७). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: गोंदिया जिल्हयात राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ व औषध निर्माते यांच्या जिल्हास्तरीय कंत्राटी कर्मचाऱ्यांना दरमहा केवळ ८,००० हजार रुपये मानधनापोटी मिळत असून सदर एकत्रित मानधनात मागील ३ वर्षात कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात न आल्याने सदर आरोग्य विभागातील कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ व औषध निर्माता युनियन-आयटक (जि.गोंदिया) यांच्या संघटनेच्या वतीने मानधनात वाढ करण्याबाबत व सोयी-सुविधा मिळण्याबाबतची मागणी केली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे जुलै, २०१२ पासून एरिअस व पुढील पीआयपी मध्ये महिन्याच्या मानधनात वाढ करण्याबाबत व इतर सायी-सुविधा प्राधान्याने देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असलेल्या आयपीएचएस कार्यक्रमातून राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ तसेच औषध निर्माता नियुक्त केले जातात.

परंतु सदर कर्मचाऱ्यांच्या विहित मानधनात वाढ करण्याबाबत आरोग्य विभागातील कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ व औषध निर्माता युनियन-आयटक (जि.गोंदिया) यांच्या संघटनेच्यावतीने शासनाकडे मागणी केली असल्याचे निवेदन आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील आदिवासी बहुल क्षेत्र असलेल्या देवलापार ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांबाबत**

**(१५) ६९२७१ (१५-०५-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील आदिवासी बहुल क्षेत्र असलेल्या देवलापार ग्रामीण रुग्णालयाकरीता २६ पदे मंजुर असुन त्यापैकी ९ पदे अनेक वर्षापासुन रिक्त असल्याबाबतचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाकरीता तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजुर असतांना केवळ एक वैद्यकीय अधिकारी, सात परिचारीकांपैकी केवळ तीन परिचारीका तसेच चार चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची पदे मंजुर असुन त्यापैकी दोन कर्मचारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भागात दोन जिल्हा परिषद व चार पंचायत समिती सर्कल असुन त्यामध्ये ६० हजारापेक्षा अधिक नागरिक वास्तव्यास असुन त्यांच्या आरोग्य सेवेकरीता केवळ एकच वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांची मंजुर रिक्त पदे अनेक वर्षापासून भरण्यात न आल्यामुळे तेथील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या भागातील मोठी लोकसंख्या व रुग्णांची होणारी नेहमीची गैरसोय लक्षात ही मंजुर रिक्त पदे भरण्यात आली आहे काय,
(६) नसल्यास, न भरण्याची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) या रुग्णालयासाठी गटनिहाय मंजूर पदसंख्या व भरलेली पदे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | गट अ | ४ | ४ | ० |
| २ | गट-ब | ० | ० | ० |
| ३ | गट-क | १५ | १२ | ३ |
| ४ | गट-ड | ७ | ६ | १ |
| एकूण | | २६ | २२ | ४ |

(३) हे खरे नाही
(४) हे खरे नाही.
या रुग्णालयात नियमित व सुरळीतपणे रुग्णसेवा देण्यात येत आहे.
(५) सहाय्यक अधिक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे व लिपिक पद पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगर (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांना पिकविमा रक्कम मिळण्याबाबत**

**(१६) ७६५८० (१३-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा दुष्काळी असताना सन २०१५ मध्ये नगर जिल्हयाला पिक विम्याच्या रक्कमा मिळाल्या असल्याने माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी नगर तालुका दुष्काळी योजनेत समावेश करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०५-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) सन २०१५-१६ खरीप हंगाम महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ अन्वये अहमदनगर जिल्ह्यातील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या ५८१ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली होती. तसेच शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल, २०१६ अन्वये रब्बी २०१५-१६ हंगामातील अंतीम पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ९५३ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात आली होती.

सन २०१५-१६ मधील अहमदनगर जिल्ह्यातील रब्बी व खरीप हंगाम दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना अनुदान वाटप करण्यासाठी एकूण रूपये ३३६.९२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्यामधील जिल्हा शासकीय रुग्णालयात दिव्यांगत्व प्रमाणपत्र देण्यास होत असलेली दिरंगाई**

**(१७) ७८३७५ (१८-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्यामधील जिल्हा शासकीय रुग्णालयात अपंगत्वाचा दाखला आणि सवलत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रुग्णांना रुग्णालयात प्रतिक्षा करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालयात गर्दीमुळे बसण्यास पुरेशी जागा नसते व पिण्याच्या पाण्याची सोयही नसल्यामुळे रुग्ण, अपंग व पालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अपंगत्वाचा दाखला आणि सवलत प्रमाणपत्र मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१) व (२) जिल्हा सामान्य रूग्णालय, ठाणे येथे दर बुधवारी ऑनलाईन दिव्यांगत्व प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येते. तांत्रिक बिघाड झाल्यास त्वरित दुरूस्त करून दिव्यांगत्व प्रमाणपत्रे देण्यात येतात.

जिल्हा रूग्णालयात दिव्यांगत्व प्रमाणपत्रासाठी गर्दी होत असल्याने रूग्णांशी सौजन्याने वागण्याबाबत सर्व संबधितांस आरोग्य सेवा संचालनालयामार्फत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

दिव्यांगाची गैरसोय टाळण्यासाठी खुल्या जागेत शेड उभारून बाकडे टाकून बसण्याची व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुखेड (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात झालेला गैरव्यवहार**

**(१८) ८२०३३ (१९-०४-२०१७). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक कार्यालयीन लेखा विभागाचे लिपिक यांनी संगनमताने गैरव्यवहार केल्याची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी पत्राद्वारे संचालक आरोग्य सेवा यांच्याकडे दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास संचालक, आरोग्य सेवा, लातूर याना जिल्हा शल्याचिकित्यक, नांदेड यांचेमार्फत चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आदेशानुसार जिल्हा शल्यचिकित्सक, नांदेड यानी गठित केलेल्या प्राथमिक चौकशी पथकाने गैरव्यवहार झाल्याने दोषी विरोधात कारवाईसाठी विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याबाबतचा अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विभागीय चौकशी अथवा विशेष लेखापरीक्षण मार्फ़त चौकशी उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यानी दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शिफारस करुन अद्याप विभागीय चौकशी विशेष लेखापरीक्षण करुन संबधित दोषी विरोधात प्रशासकीय कार्यवाही करण्याऐवजी संबधित दोषींच्या प्रशासकीय बदल्या सोयीच्या ठिकाणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशीत दोषी आढळलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१), (२) व (३) होय.

(४) अंशत: खरे आहे.

(५) व (६) या प्रकरणी सहा अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द दोषारोपपत्रासह विभागीय चौकशीचा प्रस्ताव आरोग्य संचालनालयाकडून शासनास दि.१६.२.२०१९ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची छाननी शासनस्तरावर करण्यात येत असून दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूध्द नियमानुसार योग्य कारवाई करण्यात येईल.

---

**भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाची झालेली दूरवस्था**

**(१९) ९१५६७ (१९-०८-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाकडे आरोग्य उपसंचालकांच्या दुर्लक्षामुळे रुग्णालयाची दूरवस्था झाली असून तसेच वैद्यकीय अधिक्षक यांची जाफराबाद येथे बदली झाल्यामुळे पूर्णवेळ एकही कायमस्वरूपी डॉक्टर नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे रुग्णालयात रुग्णांवर किरकोळ उपचार करून त्यांना औरंगाबाद किंवा इतर ठिकाणी अधिक उपचारासाठी पाठविण्याचा सल्ला दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ग्रामीण रुग्णालयास तातडीने पूर्णवेळ कायमस्वरूप वैद्यकीय अधिक्षक नियुक्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय भोकरदन येथील वैद्यकीय अधिक्षक हे पद रिक्त असल्याने तेथील वरीष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.डी.एम.पाटील यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. त्यांची जिल्हाधिकारी यांचेस्तरावरुन ग्रामीण रुग्णालय जाफराबाद येथे बदली झाली होती. तथापि, त्यानंतरही त्यांचेकडेच अति. कार्यभार देण्यात आलेला होता. सदरहू कालावधीत रुग्णांच्या उपचारामध्ये हेळसांड होवू नये, यास्तव ग्रामीण रुग्णालय बदनापूर व जिल्हा रुग्णालय जालना येथील वैद्यकीय अधिकारी यांना दैनंदिन कामकाजासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले होते.

(२) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालयात उपचार होत नसलेल्या अती गंभीर रुग्णांना गरज पडल्यास पुढील उपचारासाठी रुग्णहिताच्या दृष्टीने प्रसंगी औरंगाबाद वैद्यकीय महाविद्यालय येथे पाठविले जाते.

(३) ग्रामीण रुग्णालय भोकरदन येथे दि.16.08.2017 पासून वैद्यकीय अधिक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत ते कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### जळगांव जिल्ह्यातील आरोग्य विभागातील असलेल्या रिक्त पदांबाबत

**(२०) ९६२७३ (२७-१२-२०१७). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील आरोग्य विभागातील रिक्त असलेली २१ पदे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत भरण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे काय व किती कालावधीत ती पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०३-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत २५ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) जिल्हास्तरावरुन सदर रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली आहे.

---

**धर्मादाय आरोग्य सेवकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२१) १०३७३६ (०६-०१-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांचेमार्फत प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात नेमणूक करण्यात आलेल्या धर्मादाय आरोग्य सेवकांना अद्यापपर्यंत ओळखपत्र व वेतनही वेळेवर मिळत नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.वित्त व न्याय विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली धर्मादाय आरोग्य सेवकांचे कामकाज आणि त्यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत प्रधान सचिव यांनी धर्मादाय आरोग्य सेवकांच्या पगारवाढीबाबत तातडीने निर्णय घेण्याचे आदेश राजीव गांधी जीवनदायी योजना सोसायटीच्या मुख्य प्रतिनिधींना दिले आहेत, हे ही खरे आहे काय;

(३) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांचेमार्फत प्रत्येक धर्मादाय रुग्णालयात नेमणूक करण्यात आलेल्या धर्मादाय आरोग्य सेवकांच्या विविध अडचणी तातडीने सोडविण्यासह, वेतनवाढ करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) दिनांक २९.०४.२०१७ व दिनांक २६.०२.२०१८ च्या धर्मादाय आयुक्त कार्यालयांमध्ये झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार धर्मादाय आरोग्य सेवकांच्या विवीध बाबींच्या अनुषंगाने राज्य आरोग्य हमी सोसायटी व धर्मादाय आयुक्त कार्यालयांकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.राज्य आरोग्य हमी सोसायटी अंतर्गत मनुष्यबळ एजन्सीमार्फत आतापर्यंत २० धर्मादाय आरोग्य सेवकांना तात्पुरते ओळखपत्र देण्यात आले आहे. धर्मादाय आरोग्य सेवकांना मिळणारे वेतन व वेतनवाढ याबाबत त्यांचेशी झालेल्या करारातील अटी व शर्ती तपासून कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कृषी संशोधन केंद्रातील कृषी तज्ञाची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२२) १०३९७० (०६-०१-२०१८). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदेवाही (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कृषी संशोधन केंद्रातील कृषी तज्ञाची पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सिंदेवाही तालुक्यातील कृषी संशोधन केंद्रातील कृषी तज्ञाची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) शासनाच्या दिनांक ०२.०६.२०१५ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सरळसेवेच्या पदभरतीवर घातलेल्या रिक्त पदाच्या ५०% निर्बधाच्या अधीन राहून विद्यापीठाने रिक्त पदांच्या ५०% शिक्षवर्गीय पदभरती केलेली आहे. सदर पदभरती प्रक्रियेदरम्यान २ सहयोगी प्राध्यापक व एक सहायक प्राध्यापक यांना कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही येथे पदस्थापना दिलेली आहे. तसेच मार्च २०१८ अखेर पूर्ण करण्यात आलेल्या भरती प्रक्रियेदरम्यान एक वरिष्ठ संशोधन सहायक व ३ कृषि सहायक यांना कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे.

---

**राज्यामध्ये अवयव प्रत्यारोपणाचे धोरण अद्याप पर्यंत निश्चित नसल्याबाबत**

**(२३) १०४८५० (०७-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये अवयव प्रत्यारोपणाचे धोरण अद्याप पर्यंत निश्चित नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत राज्य सरकारला कधीपर्यंत धोरण अंमलात येईल याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवयव प्रत्यारोपणाचे धोरण निश्चित नसल्यामुळे अनेक रुग्णांचे नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य सरकार कधीपर्यंत अवयव प्रत्यारोपणाचे धोरण निश्चित करणार आहे,

(५) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

मानवी उपचाराकरीता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री होऊ नये याकरीता मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणेकरीता केंद्र सरकारचा मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा-१९९४ दिनांक ४.०२.१९९५ रोजी राज्यामध्ये लागू केला आहे. केंद्र शासनाच्या सुधारित मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा-२०११ व मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम-२०१४ मधील नियम व तरतूदीनुसार रूग्णालयांना अवयव प्रत्यारोपणाकरीता नोंदणी/पुनर्नोंदणीची कार्यवाही करण्यात येते.

(२) माअप्र कायद्यांतर्गत नोंदणीकृत नसलेल्या रूग्णालयांना ब्रेनडेड घोषित करून अवयव काढण्याची परवानगी देणेबाबत मार्गदर्शक सूचना तयार करून शपथपत्र दाखल करण्याबाबत आदेशित केले होते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील कृषी विभागाअंतर्गत सामुहिक शेततळ्याच्या खोदकामात झालेली अनियमितता

**(२४) १०६४९७ (०१-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामुहीक शेततळ्यासाठी इच्छुक शेतकरी लाभार्थी समुहाकडे असलेल्या फलोत्पादन क्षेत्रानुसार सामुहिक शेततळ्याचे आकारमान मंजुर करण्यात यावे असे मार्गदर्शक सुचना असतांना आणि कमीत कमी १२०० संत्रा अथवा इतर फळबागांचा समावेश असणे आवश्यक असतांना अमरावती जिल्हयात हि योजना राबवितांना योजनेच्या मार्गदर्शक सुचनेकडे दुर्लक्ष केल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मौजे जहागीरपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) सर्वे क्र.८६ मधील एका शेतकऱ्याच्या सन २००७-०८ या वर्षात मत्स्यसंवर्धक विकास यंत्रणेमार्फत खोदण्यात आले असुन याच शेतकऱ्याच्या नावे सर्वे. १०२ मध्ये मार्च, २०१२ मध्ये मत्स्य शेततळ्याला तिवसा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने पत्र. २५६९ २७ फेब्रु. २०१२ नुसार तांत्रीक मंजुरी देवून सामुहीक शेततळे खोदल्याचे दाखविण्यात आल्याचे निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सामुहीक शेततळे दखविण्याऱ्या तत्कालीन तालुका कृषी अधिकाऱ्यांचा गैरकारभार काही शेतकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले असुन सामुहीक शेततळ्यांच्या निर्मीतीकरिता ज्या शेतकऱ्यांची संमती आवश्यक असतांना खोट्या सह्या करुन त्यांची संमती दाखविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अनियमितता करणा-या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली वा करणार आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हलकर्णी (जि.कोल्हापूर) येथील आरोग्य केंद्रात कर्मचारी नेमण्याबाबत**

**(२५) १०७२०८ (०१-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हलकर्णी (जि.कोल्हापूर) येथील आरोग्य केंद्रात पुरेश्या प्रमाणात कर्मचारी नेमण्याची मागणी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत दि.१३.७.२०१८ रोजी वृत्तपत्रात एकूण ७२३ पदांसाठी जाहीरात देण्यात आली होती. प्राप्त अर्जानुसार भरती प्रक्रिया सुरु आहे. ग्रामीण स्तरावरील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे जिल्हा आरोग्य सेवेतील असून संबंधीत जिल्हा परिषदेमार्फत भरण्यात येतात. ग्राम विकास विभागाच्या दि.२४.८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदेकडील रिक्त पदांचा तपशील मागवून ऑनलाईन परिक्षा पद्धतीने भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**पालघर जिल्ह्यात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी नवजात शिशू अतिदक्षता कक्षांची संख्या वाढविण्याबाबत**

**(२६) १०८३६६ (३१-०३-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासीबहुल जव्हार, मोखाडा भागात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यासाठी नवजात शिशू अतिदक्षता कक्षांची संख्या वाढविण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उपक्रमासाठी खाजगी कंपन्याची मदत घेण्याचा शासनाचा विचार आहे, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, शिशू अतिदक्षता विभागाची संख्या वाढविण्याचा कार्यक्रम अतिशिघ्रतेने राबविण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.

१४ खाटांचा कक्ष कार्यान्वित असून, आणखी १४ खाटांचा एसएनसीयु कक्ष तयार करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

यासाठी केंद्र शासनाच्या व १३ व्या वित्त आयोगाचा निधी वापरण्यात आला.

(३) सदर कक्ष कार्यान्वित केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात जन्मतःचा हृदयदोष असलेल्या बालकांना उपचार मिळत नसल्याबाबत**

**(२७) ११२१५० (०१-०४-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जन्मतःचा हृदयदोष असलेल्या बालकांचे प्रमाण अधिक असून वैद्यकिय सेवा उपलब्ध न झाल्याने किंवा उपचारासाठी पैसे नसल्याने अनेक लहान मुलांना वेळेवर उपचार मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) तसेच, मुंबईममध्ये ५०० हून अधिक रूग्ण उपचाराच्या प्रतिक्षेत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, अशा रूग्णांना तात्काळ उपचार उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) नाही.
(२) (३) व (४) बृहन्मुंबई मध्ये राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत शाळा तपासणी पथकामार्फत जून, २०१७ ते डिसेंबर, २०१७ पर्यन्त ४३५ म.न.पा. शाळांमध्ये एकूण १,१९,४९१ विद्यार्थी तपासले असता, त्यात २४ रुग्ण हृदय दोष असल्याचे आढळले. त्यापैकी १२ रुग्णांवर वैद्यकीय उपचार चालू आहेत, उर्वरित ५ रुग्णांचे आजाराच्या स्थितीचे निरिक्षण करुन आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया करण्याचे प्रस्तावित करण्यात येणार आहे.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील खोच गावाजवळच्या शिरसोन पाड्यातील कुपोषित बालकाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२८) ११२२६४ (०१-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील खोच गावाजवळच्या शिरसोन पाड्यातील एकनाथ मालक (वय ३) या कुपोषित बालकाचा मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालकाच्या उपचारासाठी जे.जे.रुग्णालयात नेण्याकरीता ग्रामीण रुग्णालयाने रुग्णवाहिका नाकारल्याचा आरोप सरपंच व मृत बालकाच्या नातेवाईकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार बालकाच्या मृत्यूस कारणीभूत असणाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
बालकांचा मृत्यू Complex Congenital heart disease ने झाला आहे.
(२) हे खरे नाही.
याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परळी (जि.बीड) शहरातील वडसावित्री नगरातील बालिकेच्या मृत्यू झाल्याबाबत**

**(२९) ११३१४२ (११-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) शहरातील वडसावित्री नगरातील निकिता नंदू जाधव या ९ महिन्याच्या बालिकेचा गोवरपेन्टा लस दिल्यामुळे मृत्यू झाला असल्याचे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सदर बालिकेच्या नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालयात जाऊन संबंधितावर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी समिती नियुक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या समितीने आपला अहवाला शासनाला दिला आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सदर बालिकेचा मृत्यू दि.२७.१.२०१८ रोजी लसीकरणामुळे झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

जिल्हास्तरीय AEFI (Adverse Event Following Immunization) समितीने सदर बालिकेच्या मृत्यूबाबत अन्वेषण केले व बालिकेचा मृत्यू लसीकरणामुळे झालेला नाही असा निष्कर्ष काढला आहे. तसेच या प्रकरणी कोणीही दोषी आढळून आलेले नाही. त्यामुळे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील सिव्हील रुग्णालयासह जिल्हा उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालयातील स्वच्छता कर्मचा-यांना वेतन मिळाले नसल्याबाबत**

**(३०) ११४०६६ (०६-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील सिव्हील रुग्णालयासह जिल्हा उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालयात ई निवेदनाद्वारे नेमण्यात आलेल्या स्वच्छता कर्मचा-यांना गत तीन महिन्यापासून वेतनच मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात १२५ पेक्षा जास्त सफाई कामगार असून सदर कर्मचा-यांना तीन महिन्याचे वेतन न देण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार उक्त कर्मचा-यांचे वेतन तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सरावली-नाईकपाडा (ता.डहाणू) येथील वाणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्याबाबत

**(३१) ११४६६४ (०१-०४-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरावली-नाईकपाडा (ता.डहाणू) येथील वाणगाव प्राथमिक आरोग्य केंद्र गत अनेक वर्षे बंद अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड्यापाड्यातील आदिवासींच्या सोईकरिता पाच वर्षापूर्वी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान योजनेअंतर्गत निधीचा वापर करुन हे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यात आल्यापासून बंद अवस्थेत आहे त्यामुळे स्थानिकांना आरोग्यसेवा पुरेशा प्रमाणात मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहु आरोग्य केंद्राची चौकशी करण्यात आली आहे काय
(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.
(३ (४) व (५) या संदर्भात चौकशी केली असता, सदरहू उपकेंद्रामध्ये आवश्यक असलेल्या सोयी-सुविधांची कामे पूर्ण न केल्यामुळे सदरहू उपकेंद्राचा ताबा घेण्यात आलेला नाही. सर्व सोयी-सुविधांच्या पूर्ततेसह उपकेंद्राचा ताबा देण्याचे निर्देश संबंधित ठेकेदारास देण्यात आलेले आहेत. सर्व सोयी-सुविधांची पूर्तता झाल्यानंतर, सदरहू उपकेंद्राचा ताबा घेऊन सुरु करण्यात येणार आहे.

---

### येवला (जि.नाशिक) येथे शासकीय कृषी महाविद्‌यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३२) ११७५५६ (३१-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यात शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र बांधण्याची आवश्यकता तपासून शासनाला अहवाल सादर करण्याबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना शासनाने माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला येथे शासकीय कृषि महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ४ मे २०१५, २३ आक्टोंबर, २०१५, २९ जानेवारी २०१६, १ सप्टेंबर २०१६, ५ एप्रिल, २०१७ व २७ फेब्रुवारी २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.कृषी मंत्री, तसेच महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येवला येथे शासकीय कृषी महाविद्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०५-२०१९) :** (१) नाही.

(२) होय.

(३) कृषि महाविद्यालय स्थापन करण्यासाठी निकषानुसार आवश्यक जमीन येवला येथे उपलब्ध नसल्याबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे.

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी कृषि शिक्षणाचा बृहत आराखडा शासनास सादर केला आहे. सदरचा बृहत आराखडा शासनाच्या विचाराधीन आहे.

शेतकरी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत सद्यस्थितीत कोणतीही योजना नाही, तथापि हंगामनिहाय वेगवेगळया पीक योजनेमधून शेतकऱ्यांना प्रशिक्षित करण्याची कार्यवाही विस्तार व प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत तालुका स्तरावरुन वेळोवेळी करण्यात येते.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील किडनी प्रत्यारोपण झालेल्या गरीब रुग्णांना मोफत औषधे देण्याबाबत

**(३३) ११७९३३ (०१-०८-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेन्नई, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश राज्यातील किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झालेल्या गरीब रुग्णांना मोफत औषधे उपलब्ध करुन देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,राज्यातील सर्वसामान्य रुग्णांना किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेनंतर दरमहा १५ ते २० हजार रुपयांची औषधे नियमितपणे घ्यावी लागत असल्याने त्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामूळे चेन्नई, मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश राज्यांच्या धर्तीवर

राज्यातील किडनी प्रत्यारोपण झालेल्या गरीब रुग्णांना मोफत औषधे उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत किडणी प्रत्यारोपणासाठी प्रतिकुटुंब प्रतिवर्ष २.५ लक्ष रकमेपर्यंत अंगीकृत रुग्णालयातुन शस्त्रक्रिया व शस्त्रक्रिया पश्चात उपचार मोफत दिले जातात. त्यात किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेपश्चात १ वर्षासाठी देण्यात येणाऱ्या Immunosuppression औषधांचा समावेश असून १ लाख रकमेपर्यंत एक वर्षासाठी मोफत हि औषधे दिली जातात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील परिचारिका आणि आशा कर्मचा-यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत

**(३४) ११७९५२ (०१-०८-२०१८). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नऊ जिल्ह्यांमध्ये अर्भक व माता मृत्युदरामध्ये होत असलेली वाढ लक्षात घेता या जिल्ह्यामधील सुमारे ७० हजार परिचारिका आणि आशा कर्मचा-यांना नवजात अर्भकाची काळजी कशी घ्यायची व गोल्डन मिनिटमध्ये त्यांच्यावर कसे उपचार करावयाचे यांचे प्रशिक्षण देण्यासाठी राज्य शासनाच्या आरोग्य विभागाने दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जॉन्सन अॅण्ड जॉन्सन कंपनीसोबत सामंजस्य करार केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सामंजस्य कराराचे स्वरुप काय आहे,
(३) असलयास, सदर कराराची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्यामध्ये या संस्थेद्वारे पुढीलप्रमाणे सहाय्य करण्यात येत आहे :-
I) नर्स, आशा व आरोग्य सेविका यांचे प्रसूती, नवजात काळजी व शल्यक्रिया गृह याबाबत कौशल्य विकास व क्षमता वाढविणे.
II) एम.डी.आर.टी.बी. याबाबत निदान, प्रशिक्षण व जनजागृती इ.
III) अर्श कार्यक्रमांतर्गत आंतर विभागीय समन्वय व बळकटीकरण मोडयुल तयार करणे इ.
IV) जंतुसंसर्ग प्रतिबंध या अंतर्गत जिल्हा रुग्णालय ठाणे व अलिबाग येथे पायलट स्टडी इ.

महाराष्ट्र शासन प्रशिक्षणार्थींना कार्यमुक्त करुन, प्रशिक्षण संस्था उपलब्ध करणे, संनियंत्रण करणे इत्यादी कार्य करणार आहे.

(३) पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियांनातर्गत कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना सेवेत सामावून घेणेबाबत**

**(३५) ११७९७० (०६-०८-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम) अंतर्गत आरोग्य विभागातील विविध पदावर कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याबाबत अभ्यास व शिफारशी करण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली असून तीन महिन्याच्या कालावधीत सदर समिती आपला अहवाल सादर करणार होती तसेच अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजन करण्याबाबतचे आश्वासन मा.आरोग्य मंत्री यांनी दिल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आश्वासन पूर्ण न झाल्याने नाशिक ते मुंबई लाँग मार्च काढून दिनांक २४ मे २०१८ रोजी वा त्यासुमारास आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण करण्याचा इशारा ग्रामीण आरोग्य अभियान महामंडळाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत आरोग्य विभागातील विविध पदावर कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०८.०५.२०१८ च्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेमध्ये समायोजित करण्यासंदर्भात अभ्यास व शिफारस करण्यासाठी मा.मंत्री वित्त विभाग, मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण आणि मा.मंत्री, ग्रामविकास विभाग यांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अधिकारी / कर्मचारी महासंघ यांनी त्यांना शासकिय सेवेत कायम करण्याच्या मागणीसाठी दि.०८.०५.२०१८ पासून कामबंद आंदोलन सुरु केले होते व संघटना नाशिक ते मुंबई लॉग मार्च काढणार होती. समितीच्या दि.१८.०५.२०१८ रोजीच्या बैठकीतील चर्चेनुसार संघटनेने दि.१९.०५.२०१८ रोजी कामबंद आंदोलन मागे घेत असल्याचे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रुग्णवाहिका चालकांना वेतन अदा करण्याबाबत

**(३६) ११९०८७ (२५-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत ठेकेदार पध्दतीवर कार्यरत असलेल्या ७६ रुग्णवाहिका चालकांना माहे नोव्हेंबर, २०१७ ते मार्च २०१८ पर्यंतचे वेतन देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या रुग्णवाहिका चालकांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे त्यांनी जिल्हा परिषदेच्या इमारतीसमोर कामबंद आंदोलनास सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामबंद आंदोलनामुळे जिल्हयातील रुग्णवाहिका बंद झाल्यामुळे गर्भवती महिला, अपघातग्रस्ता यांना वेळेवर उपचार मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार रुग्णवाहिका चालकांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अनुदानाची तरतुद व वितरण यासाठी काही कालावधी लागल्याने माहे ऑक्टोंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ पर्यंतचे वेतन अदा करण्यास काहीसा उशीर झाला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) दि.३१.०३.२०१८ रोजी रु.५२.०० लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली. सदर तरतूदीतून माहे ऑक्टोंबर २०१७ ते फेब्रुवारी २०१८ अखेरचे वेतन ठेकेदारास अदा करुन कंत्राटी वाहनचालकांचे वेतन देण्याची कार्यवाही केली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांच्या शेती मालाला हमी भाव मिळाण्यासह, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी लागु करण्याबाबत केलेला संप

**(३७) १२१०४४ (३१-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या शेती मालाला हमी भाव मिळावा, स्वामीनाथन आयोगाच्या शिफारसी लागु करण्यासह इतर मागण्यासाठी राष्ट्रीय किसान महासंघाच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी संप केल्याचे दिनांक २६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपामध्ये देशभरातील १३० शेतकरी संघटना सहभागी झाल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संप टाळण्यासह शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०५-२०१९) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) देशभरातील ११० शेतकरी संघटना एकत्र येऊन राष्ट्रीय किसान महासंघाची स्थापना केली असल्याचे महासंघाच्या निवेदनात नमूद केलेले आहे.

(३) राष्ट्रीय किसान महासंघाच्या प्रमुख मागण्यासंबंधी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(अ) राज्यामध्ये दुष्काळ व नापिकी मुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दि.२८/६/२०१७ च्या शासन निर्णयान्वये छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेद्वारे कर्जमाफी योजना लागू करण्यात आलेली आहे.

(ब) किमान आधारभूत किंमत जाहिर करणे ही बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. सन २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून केंद्र शासन शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी उत्पादन खर्चावर ५०% नफा धरुन किमान आधारभूत किंमत जाहीर करीत आहे.

(क) नैसर्गिक आपत्ती प्रसंगी तसेच विविध योजनांच्या माध्यमातून राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य दिले जाते. शेती व्यवसाय करतांना होणारे विविध अपघात तसेच वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, वाहन अपघात वा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अन्य कोणतेही अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. अशा परिस्थितीत अपघातग्रस्त शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक लाभ देण्याकरीता "गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना" राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या पिकांचे दुष्काळ, अतिवृष्टी, पूर यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच किड व रोगांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्यास, योजनेच्या निकषांनुसार सहभागी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन आर्थिक मदत करण्याकरीता राज्यामध्ये पंतप्रधान पिक विमा योजना राबविण्यात येत आहे.

तसेच सन २०१८-१९ पासून २ हे. पर्यंत लागवडीखालील क्षेत्र असलेल्या शेतकरी कुटुंबासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्षी रु.६०००/- इतके अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(ड) राज्यातील २६८ महसूली मंडळामध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आलेला असून त्या भागातील कृषिपंप ग्राहकांना वीज बिलात शासनाच्या प्रचलित सवलतीच्या दरामध्ये ३३.५ टक्के सूट देण्यात येत असून, टंचाई सदृश्य गावातील कृषीपंपाची वीज जोडणी खंडीत न करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(इ) राज्यात बैलगाडी शर्यती आयोजनास परवानगी नसली तरी या संदर्भात दि.१०/११/२०१७ च्या अधिसूचनेन्वये बैलगाडी शर्यतीस परवानगी देण्याबाबत अंतिम नियम राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. तथापि, मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दाखल झालेल्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार यासंदर्भात उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२), तसेच दि.१०/११/२०१७ च्या नियमामधील तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी पुढील आदेश होईपावेतो बैलगाडी शर्यतीस परवानगी देऊ नये असे परिपत्रक दि.१०/११/२०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(ई) राज्यातील उत्पादित होणारे पिशवीबंद दूध वगळून उर्वरित ३.२/८.३ गाय दुध व त्यापेक्षा अधिक गुणप्रतीच्या दुधाकरीता रु.५/- प्रति लिटर अनुदान योजनेस दि.३१/१/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच, जीवनावश्यक वस्तू अधिनियम,१९५५ या अधिनियमातील तरतुदीनुसार जीवनावश्यक वस्तूंचे हमीभाव ठरविण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. दुधासाठी केंद्र शासनाने किमान आधारभूत किंमत अद्यापी निश्चित केलेली नाही. राज्यातील दूधाची परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने दि.१९/८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दूधासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती केली आहे. केंद्र शासनाचा याबाबतचा निर्णय प्रतिक्षाधीन आहे. परंतु, केंद्र शासनाच्या निर्णयाची प्रतिक्षा न करता स्वतंत्रपणे Maharashtra Regulation of Sugarcane Price (Supplied to Factories) Act-२०१३ च्या धर्तीवर दूधाकरीता कायदा करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. सदर कायदा अस्तित्वात आल्यावर शेतकऱ्यांना दूधाकरीता योग्य भाव मिळणे अपेक्षित आहे.

(३) शेतमाल प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी केंद्र शासनाने सन २०१८ वर्ष हे भरडधान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचे घोषित केलेले आहे. त्यानुसार ज्वारी, बाजरी यासारखे भरडधान्य प्रक्रिया उद्योग सुरु करण्यात आलेले आहेत.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षाकरीता "मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना" ही नवीन योजना राज्यात सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**"जननी शिशू सुरक्षा" उपक्रमासाठी निधीची तरतूद कमी करण्यात आल्याबाबत**

**(३८) १२१६४६ (०६-०८-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या "जननी शिशू सुरक्षा" उपक्रमासाठी सन २०१६-१७ मध्ये ८४८ कोटी रुपयांची तरतूद करुन प्रत्यक्षात ४८५ कोटी रुपये खर्च केले व २०१७-१८ मध्ये या योजनेवरील खर्चाची तरतूद निम्म्याने कमी करुन ४४७ कोटी रुपयावर आणण्यात आली असून प्रत्यक्षात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान २२२ कोटी ६२ लाख रुपयेच खर्च करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, "जननी शिशू सुरक्षा" या उपक्रमावरील खर्चात निम्म्याने कपात करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या उपक्रमातील सुरक्षित प्रसूतीसाठी पुरेसे स्त्रीरोग तज्ज्ञ नसून बालरोग तज्ज्ञांचीही आरोग्य विभागाकडे कमतरता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांमध्ये विचारणा केलेली आकडेवारी ही एकूण आरसीएच कार्यक्रम संदर्भातील आहे. तथापि जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमासाठी सन २०१६-१७ मध्ये रु.१४७४८.६५ लक्ष तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी रु.६४५६.०७ लक्ष खर्च झाला आहे. तर सन २०१७-१८ मध्ये रु.१५१८९.३० लक्ष तरतुद करण्यात आली त्यापैकी डिसेंबर २०१७ अखेर रु.३२२६.१० लक्ष तर मार्च २०१८ अखेर रु.६४७९.०७ लक्ष खर्च झालेला आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

खर्चात कपात करण्यात आलेली नाही.

(३) नियमित स्त्रीरोग व बालरोग तंज्ञाची कमतरता असली तरी कंत्राटी तत्वावर विषेतज्ञांच्या सेवा घेतल्या जातात.

(४) खालील उपाययोजना केल्या आहेत-

१. ग्रामीण किंवा दुर्गम भागामध्ये अधिक वेतनाची अपेक्षा, मुलांसाठी शिक्षणाची सुविधा नसणे व इतर सोयी सुविधांचा अभाव आहे.

२. ग्रामीण, दुर्गम, अतिदुर्गम, नक्षलग्रस्त ठिकाणी काम केलेल्या वैद्यकीय अधिकारी, पदवी/पदविका प्रवेशाकरीता गुणाधिक्य दिले जाते.

३. पदव्युत्तर पदवीका व पदवीधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना अनुक्रमे ३ व ६ वेतनवाढ देण्यात येते.

४. शासन सेवेत पदवीका व पदव्यूत्तर पदवी या अभ्यासक्रमांसाठी प्रतिनियुक्तीवर असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी यांना वेतन व भत्ते चालू ठेवण्यात येतात.

५. सिझेरियन प्रसूती विशेष जोखमीच्या मातांची तपासणी पाठपुरावा, बालरुग्णाची तपासणी व आकस्मिक रुग्ण तपासणी तसेच नवजात बालकांची काळजी या सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत निर्गमित केलेल्या आदेशान्वये १६५ स्त्रीरोग तज्ञ, १६९ भूलतज्ञ व ७६ बालरोग तंज्ञाच्या कंत्राटी पध्दतीने नेमणूका ग्रामीण व उपजिल्हा रुग्णालये येथे करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आशा व गटप्रवर्तक यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत**

**(३९) १२१९६३ (०६-०८-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनाच्या आरोग्यसेवामधील आशा व गटप्रवर्तक कर्मचा-यांच्या मानधनात देशातील इतर १२ राज्यांप्रमाणे वाढ करण्याची मागणी आशा कर्मचारी संघटनांनी शासनाकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आशा कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाच्या मोबदल्यात केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या मानधनात इतर राज्य सरकारांनी ३३ टक्के ते १०० टक्के स्वहिस्सा वाढवून दिला असताना महाराष्ट्र राज्य सरकारने अद्याप हिस्सा दिलेला नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आशा कर्मचा-याच्या मानधनात वाढ करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

पाच राज्यांनी त्यांचे निधीतून आशा स्वयंसेविकांना मानधन दिले आहे.

(३) केंद्र शासनाने प्रकल्प अंमलबजावणी आराखडयात मंजूर केल्याप्रमाणे आशा स्वयंसेविकेस कामावर आधारीत मोबदला अदा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात रक्तक्षय (ॲनिमिया) रुग्णांच्या संख्येत होत असलेली वाढ

**(४०) १२२९८५ (२५-०७-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील बदललेल्या जीवनशैली आणि आहारामुळे शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होत असल्यामुळे रक्तक्षय, म्हणजेच ॲनिमियासारख्या रुग्णांच्या सख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे माहे मे २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आजाराचे प्रमाण दिवसेनदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू आजारावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाच्या मार्फत कोणत्या उपाययोजना अंमलात येणार आहेत,
(४) असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०५-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
मुंबई शहरातील रक्तक्षय म्हणजेच ॲनिमियाच्या रुग्णासंख्येत वाढ ही केंद्र शासनाच्या एच. एम. आय. एस. पोर्टलवर रिपोर्टींग करणाऱ्या संस्थांमध्ये वाढ झाल्यामुळे दिसून येत आहे.
(३) व (४) रक्तक्षय टाळण्याकरिता मुंबई महानगर- पालिका तसेच आरोग्य विभागामार्फत खालील उपाययोजना राबविण्यात येतात :-

१. गरोदर व स्तनदा स्त्रीयांना नॅशनल आयर्न प्लस इनिशीएटीव्ह कार्यक्रमांतर्गत सहा महिन्याकरिता लोहयुक्त गोळया व गरोदर पणाच्या ३ महिन्यानंतर जंतनाशक गोळी देण्यात येते.
२. किशोरवयीन मुलांना (६ ते १९ वर्षे) आठवडयातून एकदा लोहयुक्त गोळी देणे.
३. ९ महिने ते ६ वर्षाच्या बालकांना दर ६ महिन्यांनी व्हिटामिन ए व जंतनाशक गोळयाची मोहिम राबविण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक येथील संदर्भ सेवा रुग्णालयात रुग्णांची होत असलेली गैरसोय.

**(४१) १२३७९८ (०६-०८-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील शालिमार भागातील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात महात्मा फुले योजनेंतर्गत केवळ शस्त्रक्रिया करण्याच्या सूचना असल्याचे कारण सांगुन तपासण्यांचा खर्चही रुग्णांकडूनच वसूल केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब रुग्णांना गंभीर आजारांवरील उपचारांसाठी जीवनदायी योजनेंतर्गत पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबाना आरोग्य विमा अंतर्गत वर्षभरात दीड लाख रुपये उपचार खर्च शासनाकडून दिला जात असतो यात एकुण ९७२ गंभीर आजरांचा समावेश असतांना खाजगी हॉस्पिटलकडून मात्र काही ठराविक आजारांच्याच शस्त्रक्रियांवर जीवनदायीत लाभ दिला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संदर्भ सेवा रुग्णालयातील नादुरुस्त यंत्रणेची दुरुस्ती अद्याप झालेली नसताना तेल सिटीस्कॅन यंत्रणा मागिल तीन महिन्यानासून बंद पडली असल्याने रुग्णांना जिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅनसाठी पाठवले जात असून तेथे रुग्णांना पंधरा दिवसानंतरची तारीख दिली जात असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ठेकेदारांमध्ये समन्वयाच्या अभावामुळे रुग्णालयाकडून सिटीस्कॅन बंद ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, सदर रुग्णालयातील नादुरुस्त सिटीस्कॅन मशिन सुरू करण्यासह सदरहू योजनेला हॉस्पिटल प्रशासनाकडून योग्य अमंलबलावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१९) :** (१) एप्रिल, मे, जून २०१८ मध्ये अशा प्रकारची तक्रार राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या संगणक प्रणालीवर प्राप्त झाली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत ९७१ आजारावर प्रतीवर्ष प्रतीकुटुंब रु.१.५० लक्ष रकमेचे उपचार अनुज्ञेय असून नाशिक जिल्हयातील रुग्णालयातून आतापर्यंत २७ तज्ञ सेवातून १,६३,४३० उपचार व शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

(३) विभागीय संदर्भ सेवा रूग्णालय, नाशिक येथील सी.टी.स्कॅन मशीन दिनांक २४.०२.२०१८ रोजी नादुरूस्त झाली होती. सदर मशीन तातडीने दुरूस्त करून दिनांक २१.०५.२०१८ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे. बंद काळात पर्यायी व्यवस्था म्हणून जिल्हा रूग्णालय,नाशिक येथे सी.टी.स्कॅन करण्याची आवश्यकता असलेल्या ३६ रूग्णांना संदर्भीत करण्यात आले होते.

(४) मे. फेबर सिंदुरी मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., चेन्नई यांचेमार्फत सदरहू सी.टी. स्कॅन मशीन दुरूस्त करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) विभागीय संदर्भ सेवा रूग्णालय, नाशिक येथील नादुरूस्त असलेली सी.टी.स्कॅन मशीन दिनांक २१.०५.२०१८ रोजी दुरूस्त करून कार्यान्वित करण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भामधील आंबिया बहर फळगळतीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(४२) १२६९३३ (०६-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भामध्ये आंबिया बहराच्या फळगळतीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुचविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये एकवाक्यता नसल्याने शेतकरी संभ्रमावस्थेमध्ये सापडलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना आर्थिक तोटा होवू नये यासाठी योग्य मार्गदर्शन मिळण्यासह संत्र्यांच्या बाजार व्यवस्थापनेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२८-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शेतकऱ्यांना क्षेत्रीय स्तरावर कृषी विभागामार्फत पणन व अन्य बाबीसंदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन व सहाय्य करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्याच्या जलधीक्षेत्रावर नियंत्रण, नियमन व देखरेख करण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करणेबाबत**

**(४३) १२९६५४ (११-१२-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. सोमवंशी समितीच्या अहवालाप्रमाणे पर्ससीन मासेमारी संदर्भात महाराष्ट्र मासेमारी सागरी नियम व अधिनियम १९८१ मध्ये शासनाने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बदल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र मासेमारी नियम व अधिनियम १९८१ ची अंमलबजावणी होण्यासाठी स्वतंत्र अंमलबजावणी कक्ष कार्यरत करण्याची मागणी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र मासेमारी नियम व अधिनियम १९८१ ची अंमलबजावणी होण्यासाठी स्वतंत्र अंमलबजावणी कक्ष कार्यरत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०४-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्यात शाश्वत सागरी मत्स्यव्यवसाय विकास साधण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागामध्ये महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत राज्याच्या जलधीक्षेत्रावर नियंत्रण, नियमन व देखरेख करण्यासाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यास आणि त्याकरीता आवश्यक साधनसामुग्री व नव्याने ३४० पदनिर्मिती करण्याबाबत शासन स्तरावरून कार्यवाही सुरु आहे.

---

**बेरड (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील एका प्रकल्पग्रस्ताला भूखंड प्रमाणपत्र न दिल्याबाबत**

**(४४) १२९९१४ (१०-१२-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बेरड (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी एका प्रकल्पग्रस्ताला भूखंड प्रमाणपत्र न दिल्यामुळे सदरहू प्रकल्पग्रस्त लाभार्थी विशेष घटक योजनेपासून वंचित राहिल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने एकही प्रकल्पग्रस्त लाभार्थी शासनाच्या योजनापासून वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०५-२०१९) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही. संबंधीत प्रकल्पग्रस्तास शासन निर्णय दि.०४.९.१९७१ अन्वये कब्जेहक्काची रक्कम भरण्यास कळविण्यात आले होते. तथापि सदर प्रकल्पग्रस्ताने कब्जेहक्काची रक्कम न भरल्यामुळे भूखंड प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले नाही. प्रकल्पग्रस्तांकडुन कब्जेहक्काची रक्कम भरुन घेऊन भूखंड प्रमाणपत्र वितरीत करण्याची कार्यवाही सुरु असुन त्याबाबत संबंधीत प्रकल्पग्रस्तास कळविण्यात आले आहे.

---

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील कृषी सेवा पद भरती परीक्षा-२०१८**
**आदिवासीच्या प्रवर्ग निहाय पदाबाबत**

**(४५) १३०४८२ (०४-१२-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोग कृषी सेवा पद भरती परीक्षा-२०१८ मधील आदिवासीच्या प्रवर्ग निहाय पदांबाबत झालेल्या अन्यायाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जुलै,२०१८ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री तसेच संबंधित विभागाकडे निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील ७० पदांच्या पद भरतीमध्ये आदिवासीसाठी एकही जागा राखीव ठेवली नसल्यामुळे पुढील कृषी सेवा पद भरतीसाठी ७० पदांच्या जागेच्या ठिकाणी ३९९ पर्यंत जागा वाढविल्या आहेत. परंतु अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील वाढ दिलेल्या जागेसाठी आदिवासी विद्यार्थ्यांना पूर्व परीक्षेशिवाय अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याबाबत वा त्या जागेकरीता नव्याने जाहिरात देऊन सदरील जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि.०७ मार्च, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये शासनाच्या मागणीनुसार कृषि उपसंचालक (गट-अ) व कृषि अधिकारी (गट-ब) संवर्गातील एकूण ७० पदांचा समावेश करण्यात आला होता. सदर जाहिरातीमध्ये पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या सुचनेनुसार बदल/वाढ होण्याची शक्यता नमूद करण्यात आली होती.

शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या अनुषंगाने आवश्यक पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी वित्त विभागाने दि.१६.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीवरील निर्बंधामधून काही महत्वाच्या सेवांना वगळून १००% पदभरतीस मान्यता दिली. यामध्ये महाराष्ट्र कृषि सेवा या संवर्गाचा समावेश होता. त्यानुसार या संवर्गाच्या पदसंख्येत व

आरक्षणामध्ये मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये बदल करण्यात आला. पूर्व परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याकरीता २ आठवड्यांचा कालावधी देण्यात आला होता.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४६) १३०७३२ (०४-१२-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात गट ब संवर्गातील १९ पदे मंजुर असून केवळ ९ पदे भरलेले आहेत. तसेच नागपूर विभागात कृषी खात्याच्या एकुण मंजुर ३९१५ पदांपैकी केवळ २४१२ पदे भरलेली असून १५०२ पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भात आत्महत्याग्रस्त जिल्हयामध्ये जवळपास ४० टक्के कृषी विभागाचे पदे रिक्त असल्याने विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनांचा लाभ लाभार्थीना मिळत नसल्याने आत्महत्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नागपुर येथील विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१९) :** (१) होय, हे अशंतः खरे आहे.
नागपूर येथील विभागीय कृषि सह संचालक कार्यालयात माहे मार्च, २०१९ अखेर गट ब संवर्गातील १९ मंजूर पदांपैकी १३ पदे भरलेली आहेत. तसेच नागपूर विभागात कृषि खात्याच्या एकूण मंजूर ३९१५ पदापैकी २५१९ पदे भरलेली असून १३९६ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
नागपूर विभागातील रिक्त असणाऱ्या पदांचा कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिला आहे. संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यांनी प्रयत्नांची पराकाष्टा करुन शेतकऱ्यांना विविध पध्दतीने मार्गदर्शन करुन विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनेचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचविलेला आहे.
(३) कृषि सेवा परीक्षा-२०१८ करिता महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील सरळसेवेच्या ८३ पदांचे व महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २९९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांची शिफारस शासनास प्राप्त झाल्यानंतर नागपूर विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येईल. तसेच कृषि पर्यवेक्षक संवर्गामधून महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब कनिष्ठ संवर्गात पदोन्नती देताना दि.२३.०१.२०१९ च्या शासन आदेशांन्वये सुमारे ७४ अधिकाऱ्यांना नागपूर विभागात पदस्थापना देण्यात आलेली आहे.

सन २०१५ मध्ये १३६ व सन २०१८ मध्ये १२१ कृषि सेवक उमेदवारांना या विभागात नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच मेगाभरती सन २०१८-१९ अंतर्गत कृषि सेवकांच्या एकूण २४९ पदांकरीता परीक्षा घेण्यात आलेली आहे.

कृषि पर्यवेक्षकाची ३० टक्के पदे मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये सूचित केल्यानुसार प्रशासकीय विभागांकडून अंतिम आकृतिबंध मंजूर करुन घेण्यात आल्याशिवाय, संबंधित विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतिम झाल्यानंतर गट-क संवर्गाच्या (तांत्रिक पदे वगळून) पद निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी उत्पादने कृषी विद्यापीठाकडून तपासणी व मंजूरी न घेता अवैधरित्या विक्री होत असल्याबाबत**

**(४७) १३२३४३ (०७-१२-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध होणारी कृषी उत्पादने कृषी विद्यापिठाकडून तपासणी व मंजूरी न घेता अवैधरित्या विक्री होत असल्याचे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापिठामार्फत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) कृषि निविष्ठाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सन १९८३ पासुन राज्यात स्वतंत्र गुण नियत्रण यंत्रणा कार्यरत आहे.कृषि विभागामार्फत बियाणे खते व किटकनाशके या कृषि निविष्ठाचे उत्पादन व विक्रीसाठी बियाणे कायदा १९६६, बीयाणे नियम १९६८, खत नियंत्रण आदेश,१ ९८५ किटकनाशक कायदा १९६८, किटकनाशक नियम १९७१ व किटकनाशक नियंत्रण आदेश या कायदयातंर्गत सदर नियम, अधिनियम व आदेशाची काटेकोर अंमलबजावणी नियमितपणे निरीक्षकामार्फत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात असलेली रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४८) १३३१६२ (०४-१२-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात तालुका कृषी अधिका-यांसह अनेक कर्मचा-यांची पदे रिक्त असल्यामुळे या रिक्त पदांमुळे कार्यालयाच्या कामकाजावर परिणाम होवून शेतक-यांच्या शेती विषयक समस्या सोडविण्यासाठी विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांवर अधिकारी व कर्मचा-यांच्या नियुक्ती करण्याबाबत नांदगांव मतदार संघातील लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री कृषी, मा.राज्यमंत्री कृषी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदगांव तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नांदगाव (जि.नाशिक) येथील तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील तालुका कृषि अधिकाऱ्यांचे पद रिक्त आहे. तसेच या कार्यालयातील एकूण ६७ मंजूर पदांपैकी ४६ पदे भरलेली असून २१ पदे रिक्त आहेत. तथापि, या रिक्त पदांचा पदभार अन्य अधिकारी / कर्मचारी यांचेकडे सोपवून कृषि विभागातील विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीविषयक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कृषि सेवा परीक्षा-२०१८ करिता महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील सरळसेवेच्या ८३ पदांचे व महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २९९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांची शिफारस शासनास प्राप्त झाल्यानंतर नांदगाव तालुक्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येईल. मेगाभरती सन २०१८-१९ अंतर्गत कृषि सेवकांच्या एकूण १०८ पदांकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

कृषि पर्यवेक्षकाची ३० टक्के पदे मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे भरण्याची कार्यवाही लवकरच करण्यात येणार आहे. वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये सूचित केल्यानुसार प्रशासकीय विभागांकडून अंतिम आकृतिबंध मंजूर करुन घेण्यात आल्याशिवाय, संबंधित विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतिम झाल्यानंतर गट-क संवर्गाच्या (तांत्रिक पदे वगळून) पद निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय कृषी विकास अंतर्गत निधीअभावी देयके प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) १३३२३५ (०४-१२-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत सन २०१६-१७ ते आता पर्यंत मंजूर असलेली शेततळे, शेड नेट आदी घटकांची शेतकऱ्यांची देयके निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सदर निधी मंजुरीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०५-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुका कृषी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(५०) १३३६७० (०४-१२-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुका कृषी कार्यालयात ३३ पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त्त कृषी कार्यालयात सहायक अधिक्षक, वरिष्ठ लिपिक अशी प्रत्येकी १, कनिष्ठ अधिकारी ३, कनिष्ठ लिपिक १, अनुरेखक ५, कृषी सहायक गट क मधील ४, कृषी सहायक गट क मधीलच अन्य १४, शिपाई/रखवालदार २ अशी पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संगमेश्वर तालुका कृषी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तालुका कृषी अधिकारी, संगमेश्वर कार्यालयात महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील ३ पदे, कृषि पर्यवेक्षकांची ४ पदे व कृषि सहाय्यकांची १४ पदे रिक्त होती.

(२) व (३) कृषि सेवा परीक्षा-२०१८ करिता महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या २९९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांची शिफारस शासनास प्राप्त झाल्यानंतर संगमेश्वर तालुक्यातील कृषि अधिकाऱ्यांची रिक्त पदे प्राथम्याने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. सन २०१७-१८ मधील कृषि सहाय्यकांच्या भरती प्रक्रियेतील १० कृषि सेवकांना संगमेश्वर तालुक्यात नियुक्ती देण्यात आलेली आहे. विभागीय स्तरावर कृषि सहाय्यकांना कृषि पर्यवेक्षक पदावर पदोन्नती देताना प्राथम्याने संगमेश्वर तालुक्यात पदस्थापना देण्यात येईल.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये सूचित केल्यानुसार प्रशासकीय विभागांकडून अंतिम आकृतिबंध मंजूर करुन घेण्यात आल्याशिवाय, त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतीम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतीम झाल्यानंतर गट-क मधील क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहा. अधिक्षक, अनुरेखक, वाहनचालक व लघुटंकलेखक, लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या संवर्गाच्या पद निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.